Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २२९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ११ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २२९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ११ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# मानवतेच्या महान पुजाऱ्याला लाखो गुरुदेवभक्तांकडून मौन श्रद्धांजली









## केंद्रीय मत्री नितीन गडकरी यांची विशेष उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ गुरुकुंज मोझरी**

मानवतेचे पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आज शनिवार (११ ऑक्टोबर) अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथे लाखो गुरुदेव भक्तांनी महाराजांना दोन मिनिट स्तब्ध होऊन मौन श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर गुरुकुंज नगरी 'श्री गुरुदेव'च्या घोषाने दुमदुमून निघाली.

सर्व धर्म समभावाचा संदेश देणारे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची आधुनिक काळातील महान संत म्हणून भारतासह विदेशात ओळख आहे. ग्रामगीतेतून ग्रामविकास, राष्ट्रहित, देशाच्या सीमेवर जाऊन शत्रूला खंजिरी कीर्तनातून परिवर्तन घडवणाऱ्या या संताला दरवर्षी राष्ट्रसंतांचे महानिर्वाण मराठी पंचांगानुसार आश्विन वद्य पंचमीला (इंग्रजी पंचांगानुसार शुक्रवार ११ ऑक्टोबर १९६८ साली) सायंकाळी ४ वाजून ५८ मिनिटांनी झाले होते. राष्ट्रसंतांना त्यांच्या विचारांचे सर्व धर्म पंथातील राष्ट्रसंत प्रेमी व भाविक-भक्त या दिवशी तन्मयतेने श्रीक्षेत्र गुरुकुंजात एकत्र येऊन आश्विन वद्य पंचमीला श्रद्धांजली अर्पण करतात.

दरवर्षी प्रमाणे समाधी स्थळी असलेल्या विशाल प्रांगणात लाखो गुरुदेव भक्तांनी पांढरे शुभ्र वस्त्र, भगवी टोपी घालून अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने महाराजांना श्रद्धांजली वाहिली. तर यावेळी अमेरिका, इंग्लंड, जॉर्जिया, जर्मनी, कॅनडा, दक्षिण आफ्रिका इत्यादी देशातील राष्ट्रसंत विचार प्रणालीचे अभ्यासक व परदेशी नागरिक आवर्जून उपस्थित होते. विविध देशांतून जवळपास २० ते २५ विदेशी भक्तांनी विशेष हजेरी लावून श्रद्धांजली वाहिली.

**...मज वेडची गुरुकुंजाचे**

गेल्या ५६ वर्षापासून अविरतपणे राष्ट्रसंतांना मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. राष्ट्रसंतांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्यावतीने यासाठी जय्यत तयारी केली होती. 'आवडतो मज कणकण तिथला, मज वेडची गुरुकुंजाचे ॥' या राष्ट्रसंतांनी दिलेल्या संदेशाप्रमाणे राज्याच्या कानाकोपऱ्यातुन पालख्या, दिंडी-पताकांसह लाखो भाविकांनी खंजिरीच्या नादात 'श्रीगुरुदेव की जय हो!' असा जयघोष करत टाळ, मृदंगासह गजर करत सर्वधर्म समभावाचे प्रतीक असलेल्या गुरुकुंजात सात दिवसांपासूनच डेरेदाखल झाले होते. या प्रसंगी राष्ट्रसंतांच्या भव्य दिव्य विश्व व्यापक कार्याची माहिती शब्द व सुरांच्या माध्यमातून अलोट जनसमुदायाला करुन दिल्या गेली.

**सर्वधर्मियांकडून प्रार्थना**

सुमारे दोन तास लाखोंचा जनसमुदाय राष्ट्रसंतांच्या विश्वात्मक विचार व कार्याचा, त्यातून भासणाऱ्या त्यांच्या दिव्यत्वाचा अनुभव घेत ध्यानस्थ बसलेला होता. महाद्वारावरील विशालकाय घंटेच्या निनाद होताच ठीक ४ वाजून ५८ मिनिटांनी शिस्तबद्ध रितीने गुरुदेव भक्तांनी महासमाधीस्थळाच्या दिशेने हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजलीच्या कार्यक्रमानंतर 'चलाना हमें नाम गुरु का चलाना।' व 'आरती राष्ट्रसंता जगतगुरु कृपावंता।' ही आरती व सामूहिक प्रतिज्ञा करण्यात आली. तसेच हिंदू, मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन अशा सर्व धर्मांच्या प्रार्थना आपआपल्या धर्मगुरुंकडून येथे करण्यात आल्या. हा कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी काही क्षणासाठी राष्ट्रीय महामार्गावरील वरील वाहतूक थांबवण्यात येऊन दुकानांतील व्यवहार, भोंगे स्वतःहून बंद करण्यात आले. त्यामुळे सर्वत्र नीरव शांतता पसरली होती.

**मौन श्रद्धांजलीचा नयनरम्य सोहळा**

शिस्तबद्ध पद्धतीने मौन श्रद्धांजलीचा नयनरम्य सोहळा पार पडला. यावेळी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे संचालक मंडळाच्या अध्यक्षा पुष्पा बोंडे, सर्वाधिकारी प्रकाश वाघ, उपसर्वाधिकारी लक्ष्मण गमे, प्रचार प्रमुख दामोदर पाटील, सरचिटणीस जनार्दन बोथे, श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सर्व प्रचारक, कार्यकर्ते, धार्मिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती प्रामुख्याने उपस्थित होते. नजर जाईल तिकडे भाविकांच्या उपस्थितीचा जनसागर दिसत होता. श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन आध्यात्मिक विभाग प्रमुख डॉ. राजाराम बोथे यांनी केले होते. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सह सामाजिक क्षेत्रातील नागरिक,राजकीय नेते तथा गुरुदेव भक्तांचा लाखोंचा जनसमुदाय उपस्थित होता.

# 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी' योजना ९ जिल्ह्यांचा होणार कायापालट

## कृषी उत्पादन वाढीसह शेतकऱ्यांना मिळेल कर्जाची सुविधा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ पुणे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्रासाठी दोन प्रमुख योजनांचा शुभारंभ केला. दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन संस्थेत (ख-ठख) या उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. यात राज्यातील ९ जिल्ह्यांवर लक्ष केंद्रीत केलं जाणार आहे. पाच वर्षाचा आराखडा करून तेथे कृषी विकासाची अंमलबजावणी केली जाणार आहे.



प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेत राज्यातील ९ जिल्ह्यांची निवड झाली आहे. केंद्राच्या व राज्य शासनाच्या योजनांच्या माध्यमातून तेथील शेतकऱ्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मोदींच्या हस्ते 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'च्या दूरदृष्य प्रणालीद्वारे शुभारंभानिमित्त पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात कृषीमंत्री भरणे बोलत होते.

केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतकरी सक्षम व्हावा यादृष्टीने काम करत आहे. यावर्षी जून ते सप्टेंबरपर्यंत राज्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकरी अडचणीत आला. त्याच्या हाता तोंडाशी आलेल्या पिकाचा चक्काचूर झाला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांनी त्या भागात दौरे करून शेतकऱ्यांचे दुःख, अडचणी जाणून घेतल्या. या शेतकरी बांधवांना उभे केले पाहिजे यादृष्टीने राज्य शासनाने चांगले पॅकेज जाहीर केले आहे.

राज्यात ३ हजार ५०० कृषी सखी काम करत आहेत. त्या स्वत: प्रशिक्षण घेऊन तेथील महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत. त्याचा अभिमान आहे. कृषी समृद्धी योजनेच्या माध्यमातून राज्य शासनाने कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सुरू केलेल्या मोठ्या योजनेची माहिती घेऊन सेंद्रीय शेतीमधील तंत्रज्ञान, कृषी विभागाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी, शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी कृषी सखींनी मार्गदर्शन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.



# घराचा उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडताहेत, एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ मुंबई**

मला फक्त बाळासाहेब ब्रँड माहिती आहे, इतर कोणताही ब्रँड माहिती नाही, महापालिका निवडणुकीत महायुतीलाच यश मिळेल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कधी घराचा उंबरठा न ओलंडणारे आता हंबरडा फोडत आहेत. जेव्हा द्यायची वेळ होती तेव्हा आमचे हात रिकामे आहेत-रिकामे आहेत असंच यांचं सुरू होतं असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.

राज्यातील शेतकरी संकटात आहे, त्यांच्या डोळ्यात अश्रू आहेत, या वेळेस कोणी राजकारण करू नये असं आवाहन एकनाथ शिंदे यांनी केलं. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या हंबरडा मोर्चावर जोरदार टीका केली.

उद्धव ठाकरे यांच्या हंबरडा मोर्चावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की,





यांना हे उशिरा सुचलेलं शहाणपण आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या बांधा-बांधावर आम्ही जाऊन आलो. प्रत्यक्ष जाऊन तिथली परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू आम्ही पाहिले आणि त्यावेळेस आम्ही ठरवलं की शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ राहायचं. म्हणून आम्ही एनडीआरएफचे निकष असतील, अटीशर्ती असतील त्या सर्व बाजूला ठेऊन मोठ्या प्रमाणात भरीव देण्याचं ठरवलं. शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू पुसण्याचं काम आम्ही केलं याच मला समाधान आहे.

आम्ही ३२ हजार कोटींचं पॅकेज जाहीर केलं, आम्ही म्हणालो होतो की, शेतकऱ्यांची दिवाळी आम्ही काळी होऊन देणार नाही, दिवाळी पूर्वी त्यांच्या खात्यात पैसे जमा होऊ लागले आहेत. आम्ही ४७ हजार हेक्टरी मदत केली, जमीन खरडून गेलेल्या लोकांना पुन्हा मनरेगाच्या माध्यमातून ३ लाख रुपये हेक्टरी असे ३ लाख ४७ हजार रुपये मदत केली. आतापर्यंतच्या इतिहासात इतकी मदत शेतकऱ्याला कधीच मिळाली नव्हती असल्याचे हि ते यावेळी म्हणालेत.

# त्रिभाषा धोरण समिती राज्यभरात फिरून अहवाल तयार करणार सगळ्यांच्या मताने सुटणार विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

भाषा ही संस्कृतीशी निगडीत असून केवळ बोलण्यापुरती मर्यादित नाही. माणसाचे चरित्र आणि चारित्र्य भाषेतून ठरते, त्यामुळे पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक स्तरावर मराठी भाषा (मातृभाषा) अनिवार्य असावी असे स्पष्ट मत शुक्रवारी त्रिभाषा धोरण समितीच्यापुढे नागपूरकरांनी व्यक्त केले.




राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चा अनुषंगाने राज्यात त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. ही त्रिभाषा धोरण समिती राज्यभरात फिरून विविध क्षेत्रातील नागरिकांशी संवाद साधणार आहे. याची सुरूवात शुक्रवारी नागपुरातून झाली. सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे शुक्रवारी त्रिभाषा धोरण समितीच्या संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, माजी आमदार नागो गाणार, मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, समितीचे सदस्य वामन केंद्रे, डॉ. अपर्णा मॉरिस, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबईचे उपसंचालक संजय डोरलीकर, नागपूर विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. माधुरी सावरकर आदी उपस्थित होते. सर्वप्रथम संजय डोर्लीकर यांनी समितीबाबतची माहिती सादर केली.

माजी आमदार नागो गाणार यांनी महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण हे मराठीतूनच देण्यात यावी, अशी भूमिका स्पष्ट केली. भाषा ही संस्कृतीशी निगडीत आहे. माणसाचे चरित्र आणि चारित्र्य भाषेतून ठरते, असे त्यांनी सांगितले.शिक्षक परिषदेच्या पूजा चौधरी यांनी प्राथमिक शिक्षण हे मराठीतून सक्तीने करावे, तिसरी ते सहावी परकीय भाषा ठेवावी आणि सहावी ते आठवी या तिसऱ्या टप्प्यात हिंदी भाषेचे शिक्षण द्यावे, असे मत नोंदवले. यावेळी अनेकांनी आपापली मते मांडली.

# सिमेंटचे रस्ते फॅक्टरीत बनले पाहिजे, स्लॅब तयार करून क्रेनने आणून ते बसवले पाहिजेत : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ नागपूर**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सिमेंट रस्त्यांच्या बांधकामात नवीन तंत्रज्ञान वापरण्याबाबत मोठे वक्तव्य केले आहे. सध्याच्या काळात 'रोड फॅक्टरी'ची गरज असून 'प्री-कास्ट' मटेरियलच्या साहाय्याने आता रोड आणि इमारतींचे निर्माण आवश्यक आहे. विशेषतः सिमेंटचे रस्ते तर फॅक्टरीत बनले पाहिजेत. प्री-कास्टच्या माध्यमातून स्लॅब तयार झाले पाहिजे व क्रेनने आणून ते बसवले पाहिजेत, असे प्रतिपादन गडकरी यांनी केले.



इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स नागपूर शाखेच्या वतीने 'फॉरेन्सिक सिव्हिल इंजिनिअरिंग' या विषयावरील दोन दिवसीय अखिल भारतीय चर्चासत्राचे उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स एमएसईचे अध्यक्ष ए. डब्ल्यू जवंजाळ तसेच इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअरचे राष्ट्रीय अध्यक्ष मनीष कोठारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बांधकाम क्षेत्रातील व्यावहारिक समस्या समजून घेण्याची गरज आहे. त्याचवेळी पर्यायी बांधकाम सामग्रीच्या साहाय्याने निर्माण खर्च कमी करण्यावर भर द्यायला हवा. गुणवत्तेशी कुठलीही तडजोड न करता बांधकाम क्षेत्रातील अभियंता तसेच हितधारक यांनी पर्यावरणपूरक आणि शाश्वत असे बांधकाम करावे, असे गडकरी म्हणाले.

प्रॅक्टिस चालत नाहीत ते वकील, आर्किटेक्ट सरकारच्या यंत्रणेत येतात, सरकारी काम करणाऱ्या अभियंत्यांमध्ये चालून जाते हा दृष्टिकोन असतो व यामुळे मोठे नुकसान झाले आहे. बांधकामाच्या खराब दर्जासाठी मंत्री, लोकप्रतिनिधी अनेकदा जबाबदार असतात. मात्र, अभियंत्यांनी दर्जा कायम ठेवला पाहिजे. समस्या समजून घेत बांधकाम व्हायला हवे.

## संपादकीय ......

# भारत-अफगाणिस्तान मैत्रीचे नवे पर्व

अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री मावलवी आमीर खान मुत्ताकी हे आपल्या सहा दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी गुरुवारी नवी दिल्लीत दाखल झाले आणि पाकिस्तानच्या नाकावर टिच्चून उभय देशांमधील मैत्रीचा नवा अध्याय सुरू झाला. तालिबानने अफगाणिस्तानची सत्ता हाती घेतल्यानंतर कोणत्याही अफगाण परराष्ट्रमंत्र्याने भारताला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे. अफगाण परराष्ट्र मंत्र्यांचा हा भारत दौरा अनेक दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जात आहे. कारण, ही भेट भारत आणि तालिबान शासन यांच्यातील संबंधांमध्ये एक नवा अध्याय जोडू शकते.

भारताने अद्याप तालिबान सरकारला अधिकृत मान्यता दिलेली नाही आणि अफगाणिस्तानमध्ये समावेशक सरकार स्थापन करण्याचे वारंवार आवाहन केले आहे; मात्र आता भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि मुत्ताकी यांच्या भेटीवेळी जयशंकर यांनी सांगितले की, भारत काबूलमध्ये आपले दूतावास पुन्हा सुरू करणार आहे.भारताने अनेक वर्षांपासून अफगाणिस्तानमध्ये रस्ते, शाळा, रुग्णालये आणि संसद भवन यांसारखी विकासकामे केली आहेत. २०२१ मध्ये अफगाणिस्तानमध्ये तालिबान सत्तेवर आल्यानंतर भारताने सुरुवातीला त्यांच्यापासून अंतर ठेवले; परंतु काही काळानंतर संवादाची प्रक्रिया सुरू झाली. जून २०२२ मध्ये भारताने काबुलमध्ये एक तांत्रिक मिशन उघडले.


चालू वर्षी जानेवारीमध्ये परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दुबईत मुत्ताकी यांची भेट घेतली. त्यानंतर मे महिन्यात पहलगाम हल्ल्यानंतर जयशंकर यांनी मुत्ताकी यांच्याशी फोनवर चर्चा केली होती. जयशंकर यांनी मुत्ताकी आणि त्यांच्या प्रतिनिधी मंडळाचे उत्साहपूर्वक स्वागत केले. ही भेट भारत आणि अफगाणिस्तानमधील मैत्री आणि संबंध पुढे नेण्याची एक महत्त्वाची संधी असल्याचे त्यांनी सांगितले. भारताने आपली जुनी आणि दीर्घकाळची भागीदारी पुन्हा व्यक्त केली. दोन्ही देशांनी पूर्ण झालेल्या प्रकल्पांची देखभाल, अपूर्ण राहिलेले प्रकल्प पूर्ण करणे आणि नवीन प्राधान्यांवर एकत्र काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

भूकंपानंतर भारताने अफगाणिस्तानला मदत सामग्री पाठवली होती. आता भारताने घरे पुन्हा बांधण्यासाठी मदत करण्याची तसेच औषधे व अन्य वैद्यकीय मदत पुरवण्याची इच्छा दर्शविली आहे. याव्यतिरिक्त भारत अफगाणिस्तानच्या नागरिकांना सातत्याने खाद्य सामग्रीचा पुरवठा करत आहे. अफगानिस्तानाने खाणकाम व्यवसायात भारतीय कंपन्यांना गुंतवणुकीसाठी निमंत्रित केले आहे. भारत हा मित्र देश आहे. आमच्या भूमीचा भारतविरोधी कारवायांसाठी वापर होऊ देणार नाही, असेही अफगाणिस्तानने म्हटले आहे. दोन्ही देशांदरम्यान अतिरिक्त विमानांचेही उड्डाण सुरू झाले आहे. सध्या पाकिस्तान आणि अफगाणिस्तान संबंधांमधील तणाव विकोपाला गेलेला आहे. अशा स्थितीत मुत्ताकी यांचा हा भारत दौरा महत्त्वाचा ठरलेला आहे.

# महापालिकेतील नूतन प्रशासकीय इमारत नेहरु मैदानाच्या खुल्या जागेत होणार

## श्री अंबादेवी-एकविरादेवी विकास आराखड्याला तत्वता मान्यता

### महापालिकेत विविध कामकाजाबाबत आमदार खोडके दाम्पत्यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर आढावा बैठक



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

अमरावती महानगरपालिका क्षेत्रात शहरीकरण वाढत चालली आहे. त्या दृष्टीने नागरी सुख-सुविधा उपलब्ध करण्याला घेवून शासनस्तरावर प्रयत्न होत असले तरी महापालिका प्रशासकस्तरावर त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे अतिशय महत्वाचे आहे. यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय साधून नागरी सुविधेच्या कामांची तातडीने पुर्तता करावी, अश्या सुचना अमरावतीच्या आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी दिल्या.

आज दिनांक १० ऑक्टोंबर,२०२५ रोजी अमरावती महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यासाठी मनपाच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीमध्ये महापालिकेतील नूतन प्रशासकीय इमारत ही नेहरु मैदान येथील खुल्या जागेवर निर्माण करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

तसेच श्री अंबादेवी व एकविरादेवी येथील विकास आराखड्याला तत्वता मान्यता देण्याबाबतही सकारात्मक चर्चा करण्यात आली. या बैठकीला महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आमदार संजय खोडके, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, यश खोडके यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते. बैठकीमध्ये महानगरपालिकेच्या प्रशासकीय विभागांतील प्रलंबित कामे, नागरिकांच्या तक्रारी आणि विकास योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सर्व प्रथम मा.आमदार महोदयांचे मा. आयुक्त यांनी पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. त्यानंतर मा. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी महानगरपालिकेतील सर्व विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनेबाबत माहिती दिली. मा. आमदार महोदयांनी प्रत्येक विभागात चालणारे कामाचे कार्यपध्दती बाबत माहिती घेवुन काही विषयावर उपस्थित नागरीकांसह संबंधीत अधिकारी यांचे सोबत चर्चा करुन नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करणेबाबत सुचना दिल्यात.

मा.आमदार महोदयांनी आज विषेशतः बांधकाम विभाग, शिक्षण विभाग, नगर रचना विभाग, टॅक्स विभाग, अतिक्रमण विभाग, उद्यान विभाग, प्रकाश विभाग, पशुवैद्यकीय विभाग, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच शिवटेकडी (मालटेकडी) व वडाळी तलाव-उद्यान, शहरातील साफ सफाई व कचरा उचलणेबाबत तसेच आरोग्य विभागाशी संबंधीत कामाबाबत नागरीकांच्या समस्यावर चर्चा करुन संबंधीतांना निर्देश देण्यात आले.

अमरावती महानगरपालिकेची प्रशस्त नूतन इमारत बांधकामाचे काम अंतिम टप्प्यात प्रस्तावित आहे. याबाबतचा तज्ञ आर्किटेक्ट कडून आराखडा व स्ट्रक्चर डिझाईन लवकर सादर करावे, असे निर्देश देण्यात आले. तसेच महापालिकेतील नूतन प्रशासकीय इमारत ही नेहरु मैदान येथील खुल्या जागेवर उभारण्यासंदर्भातही बैठकीत खल देण्यात आला. या संदर्भात जिल्हाधिका-याकडे प्रस्ताव सादर करण्यासंदर्भातही बैठकीतून चर्चा करण्यात आली. मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगीतले की, या संदर्भात महाराष्ट्र राज्य इन्फ्रन्सस्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉरपोरेशन द्वारे याबाबतचे प्रारुप तयार करण्याबाबत सांगीतले तसेच श्री. अंबादेवी-एकविरा देवी मंदिराला 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळविण्यासाठी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाबाबतही आयुक्तांनी माहिती दिली. यावर दोन्ही संस्थांनसोबत मनपा प्रशासनाने समन्वय साधून श्री अंबादेवी व एकविरादेवी संस्थांन येथील विकास आराखड्याला बैठकीत तत्वता मान्यता देवून पुढील नियोजन करण्याबाबत आमदार खोडकेंनी सुचना केल्यात.

# कपाशीवर अळीचा प्रादुर्भाव; नियंत्रणासाठी करा 'हा' उपाय

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

कपाशी पिकावर सध्यस्थितीत काही भागात तंबाखुची पाने खाणारी अळी यांचा प्रादुर्भाव दिसत आहे.

अकोट तालुक्यातील दिनोडा, रोहनखेड, भांबुर्डा, अंतरगाव, वरूड-जऊळका, इसापूर या गावांमध्ये या किडीमुळे आर्थिक नुकसान पातळीवर परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे.

शेतकरी याविषयी सजग राहणे आणि नियोजनबद्ध नियंत्रण उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**अळीची ओळख**

वैज्ञानिक नाव: स्पोडोप्टेरा लिदुरा (

पतंगाची लांबी: सुमारे २२ मिमी

पंख: सोनेरी व करड्या-तांबड्या रंगाची

अंडी: मादी पतंग पानाच्या खालच्या बाजूला पुंजक्यात ८० ते १०० अंडी घालते; एक मादी सरासरी ३००-४०० अंडी घालते.

**जीवनचक्र-** अंडी अवस्था: ३-४ दिवस

अळी अवस्था: २१-२२




दिवस

कोषावस्था: ९-१० दिवस (३-१० से. मी. खोलीत)

प्रौढ अवस्था: ६-७ दिवस

एक पिढी पूर्ण होण्यासाठी ३२-४० दिवस लागतात.

**नुकसानाचा प्रकार**

तंबाखुची पाने खाणारी अळी मुख्यत्वे पानांचे हरितद्रव्य मागील बाजूने खातात. सुरुवातीला पाने जाळीदार होतात, नंतर मोठ्या प्रमाणात पाने, शेंडे, फुले, पात्या आणि बोंडे पोखरून खातात. या बहुभक्षीय किडीमुळे पिकाचे उत्पादन गंभीरपणे कमी होते.

नियंत्रणासाठी उपाययोजना

प्रतिबंधात्मक उपाय

तण नियंत्रण: बांधावरील तणांची नियमित सफाई करावी, कारण ते या किडीच्या वाढीस कारणीभूत ठरतात.

पक्षी थांबे: हेक्टरी क्षेत्रात १५-२० पक्षी थांबे लावावे. पक्षी या अळया खातात आणि नैसर्गिक नियंत्रण साधतात.

ग्रस्त पाने नष्ट करणे: अळीग्रस्त पाने किंवा पुंजके तोडून त्यासह जाळून नष्ट करणे आवश्यक आहे.

सर्वेक्षण सापळे: प्रत्येक हेक्टरी क्षेत्रात किमान १० कामगंध सापळे लावावेत.

**रासायनिक उपाय**




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

जर सापळ्यात दररोज ८-१० पतंग २-३ दिवस सतत दिसल्यास रासायनिक नियंत्रण करणे आवश्यक आहे.

खालील किटकनाशकांचे फवारणी प्रमाण वापरावे:

क्लोरॅंट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली प्रति एकर किंवा

स्पिनोटोरम ११.७० टक्के एससी २०० मिली प्रति एकर किंवा

सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी ३७५ मिली प्रति एकर किंवा

क्लोरोपायरीफॉस ५० टक्के ईसी + सायपरमेथ्रीन ५ टक्के ईसी ४०० मिली प्रति एकर

यापैकी कोणत्याही एक किटकनाशकाची फवारणी करावी.

**शेतकऱ्यांसाठी विशेष सूचना**

फवारणी करताना सुरक्षित उपकरणे वापरणे आवश्यक आहे.

रासायनिक नियंत्रण करताना फवारणी वेळ आणि प्रमाण पिकाच्या वयावर अवलंबून ठरवावी.

एकाच ठिकाणी सतत रासायनिक फवारणी टाळावी, विविध नियंत्रण पद्धतींचा अवलंब करावा.

पिकाच्या उत्पादनाच्या सुरुवातीपासून नियमित निरीक्षण करणे गरजेचे आहे.

तंबाखुची पाने खाणारी अळी एक जलद प्रादुर्भाव करणारी किड आहे, ज्याचा नियंत्रण योग्य वेळी न केल्यास उत्पादनावर गंभीर परिणाम होतो.

शेतकऱ्यांनी या किडीच्या व्यवस्थापनासाठी सर्वेक्षण, जैविक उपाय, योग्य रासायनिक नियंत्रण या त्रिसूत्रीवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

**- डी. बी. उंदिरवाडे,** विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला




# 'व्हिटॅमिन बी १२'च्या कमतरतेची 'ही' लक्षणे

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक -** व्हिटॅमिन बी १२ शरीराच्या अनेक कार्यांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. हे आरोग्यासाठी इतके महत्त्वाचे आहे की, त्याच्या कमतरतेमुळे अनेक गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. जर तुम्हाला दररोज थकवा किंवा अशक्तपणा वाटत असेल, तर याचा अर्थ शरीरात व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता असू शकते. हे एक जीवनसत्व आहे, ज्याची कमतरता स्नायूंपासून हाडांपर्यंत सर्व गोष्टींवर परिणाम करू शकते. याच्या कमतरतेमुळे शरीरात विविध बदल दिसून येतात. हे समजून घेतल्यास या सर्वांवर या जीवनसत्वाच्या पूरक आहाराने सामना करता येतो. शरीरात व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता झाल्यामुळे कोणती लक्षणं दिसतात हे जाणून घ्या.




व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे शारीरिक, न्यूरोलॉजिकल आणि मानसिक लक्षणे दिसू शकतात. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेची लक्षणे हळूहळू विकसित होऊ शकतात आणि कालांतराने खराब होऊ शकतात. काही लोकांच्या शरीरात व्हिटॅमिन बी १२ ची पातळी कमी असूनही त्यांना कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेच्या सामान्य शारीरिक लक्षणांमध्ये हे समाविष्ट आहे - खूप थकवा किंवा अशक्तपणा जाणवणे, मळमळ, उलट्या किंवा अतिसार, नेहमीप्रमाण लागणे, वजन कमी होणे, तोंडात किंवा जिभेत वेदना होणे, पिवळी त्वचा, हात आणि पाय सुन्न होणे किंवा मुंग्या येणे, दृष्टीची समस्या, गोष्टी लक्षात ठेवण्यास त्रास होणे किंवा सहज गोंधळ होणे,चालायला किंवा बोलण्यात अडचण, उदासीनता, चिडचिडेपणा, तुमच्या भावना आणि वागणुकीत बदल. या जीवनसत्वासाठी सफरचंद, केळी, संत्री यासारखी फळे तसेच पालक, बटाटा, मशरूम यांचे सेवन करणे महत्त्वाचे ठरते. सोया मिल्क,बदाम, दही, अंडी, मासे, चिकन-मटण यामधूनही हे जीवनसत्व मिळते.

# मनपाचे प्रभाग रचना हद्द दर्शवणारे नकाशे प्रसिद्ध, १४ व १५ ऑक्टोबरनंतर मतदार यादी विभाजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११ अकोला** अकोला मनपाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांचे भौगोलिक सीमा नकाशे, व्याप्ती निश्चित केल्यासंदर्भात महाराष्ट्र शासन, अधिसूचना ३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. प्रारूप प्रभाग रचना अधिसूचनेवर प्राप्त झालेल्या ४८ हरकती व सूचनांचा काळजीपूर्वक विचार करुन, राज्य शासन नियुक्त प्राधिकृत अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी केलेल्या शिफारशीनुसार, राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवण्यात आलेल्या अंतिम प्रभाग रचना प्रस्तावास ८ ऑक्टोबर अन्वये मान्यता मिळाली असल्याने महापालिकेच्या बाबतीत निवडावयाच्या सदस्यांची संख्या, प्रभाग संख्या निश्चित झाली आहे. अकोला महापालिका अंतिम प्रभाग रचनेच्या हद्दी दर्शवणारा नकाशा, त्यांची व्याप्ती निश्चित केल्यासंदर्भात माहिती परिशिष्ट - १४ व १५ नागरिकांना पाहण्यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळ तसेच अकोला महापालिकेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह आणि अकोला महापालिकेच्या पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण झोन कार्यालयामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहे. येत्या १६ ऑक्टोबरपर्यंत ती नागरिकांना पाहता येईल.१४ व १५ ऑक्टोबरनंतर मतदार यादी विभाजन आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १ जुलै २०२५ची प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचा कार्यक्रम लवकरच अंतिम टप्प्यात येणार आहे.

# नागपूर रेल्वे स्थानकावर भिकाऱ्यांना स्थान नाही

## एकाच दिवशी ४५ भिकाऱ्यांना दाखविला बाहेरचा रस्ता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नागपूर १४**

प्रशासन आणि प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरलेल्या रेल्वे स्थानकाच्या आत-बाहेरच्या भिकाऱ्यांवर रेल्वे प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

रेल्वे स्थानक परिसराची वारंवार स्वच्छता करूनही काही भिकारी, निराधार व्यक्ती आतमधील परिसरात ठिय्या मांडून तो परिसर घाणेरडा करतात. त्यांच्यामुळे प्रवाशांनाही त्रास होतो आणि रेल्वे प्रशासनासाठीही हा विषय डोकेदुखीचा ठरला आहे. त्यांना वारंवार बाहेरचा रस्ता दाखविला तरी ते काही वेळेनंतर परत रेल्वे स्थानकाच्या आतमध्ये येऊन बसतात आणि परत उपद्रव करतात. ते ध्यानात घेऊन भिकाऱ्यांवर विशेष कारवाईची मोहिम सुरू करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने काही दिवसांपूर्वी घेतला. त्यासाठी एका विशेष पथकाचीही निर्मिती करण्यात आली.

रेल्वेच्या वाणिज्य विभागाचे कर्मचारी, तिकिट तपासणीस आणि रेल्वे सुरक्षा दलाचे जवान यांचा या पथकात समावेश करून शुक्रवारी सकाळपासून रेल्वे स्थानकाच्या आत-बाहेर 'भिकारी हटाव' मोहिम सुरू करण्यात आली. त्यानुसार, विविध प्लॅटफॉर्म, फूट-ओव्हर ब्रिज, प्रतीक्षालय, तिकीट बुकिंग क्षेत्र तसेच बाहेरच्या परिसरात असलेल्या भिकाऱ्यांना दिवसभरात हुडकून काढण्यात आले. एकूण ४५ भिकाऱ्यांना रेल्वे स्थानक परिसरातून बाहेर हुसकावून लावण्यात आले.



यात रेल्वे स्थानक परिसरात कचरा गोळा करणारांचाही समावेश होता.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ११ ऑक्टोंबर २०२५ शहर/ग्रामिण

# अवैध प्रवासी वाहतुकीवर आरटीओ विभागाची धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताकदि.११ अमरावती**

अमरावती विभागातील महामार्ग, राज्यमार्ग तसेच ग्रामीण रस्ते मार्गावर गेल्या काही महिन्यांत अवैध प्रवासी वाहतूक व परवाना अटी शर्तींचा भंग करणाऱ्या प्रवासी वाहन, स्टेज कॅरेज च्या नियमाचा भंग करणाऱ्या प्रवासी बसेस वर मोटार वाहन कायदा व नियमाचे उल्लंघन केल्याने विविध गुन्हा खाली कारवाई करण्यात आली आहे. अमरावती ते मोर्शी, वरुड ते पांढुर्णा, मुलताई रस्त्यावर चालणाऱ्या स्टेज कॅरेज प्रवासी बसेस वर तसेच परतवाडा ते अंजनगाव, आकोट मार्गे अकोला, परतवाडा ते धारणी या मार्गांवरील धावणाऱ्या बसेस वर देखील कार्यवाही करण्यात आली. यामध्ये विनापरवाना, कॉन्ट्रॅक्ट कॅरेज परवाण्याच्या शर्तीचे भंग करणाऱ्या, जादा भाडे आकारणाऱ्या, वेळापत्रकाचे पालन न करणाऱ्या बसेस ची तपासणी करण्यात आली.




या मधे दोषी वाहना वर कार्यवाही करण्यात आली. १६ डिसेंबर २०२४ ते ३० जून २०२५ या कालावधीत ४२९ वाहने तपासली गेली असून त्यापैकी १४३ दोषी ठरली. या कालावधीत एकूण ७,७०,७५० रुपये इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. तर १ जुलै २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या तीन महिन्यांत ३९६ वाहने तपासून १३२ दोषी वाहनांवर ७,२७,२५०रुपये इतके दंडात्मक शुल्क आकारण्यात आले आहे.अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्याकरिता ही मोहीम या पुढेही सुरू राहणार असून दोषी बस मालक व चालकां विरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल तसेच सणासुदीच्या काळात रस्ते वाहतूक सुरक्षा व ज्यादा भाडेवाढ या अनुषंगाने तपासणी मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येईल असेही प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी या वेळी सांगितले.

# लाडक्या बहिणी झाल्या त्रस्त; योजनेत ई-केवायसीचा गोंधळ

*विदर्भ प्रजासत्ताक*
*दि.११अमरावती*

*महाराष्ट्र शासनाच्या 'लाडकी बहीण' योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेत महिलांना प्रचंड अडचणी येत आहेत. १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर असा दोन महिन्यांचा कालावधी दिला असला तरी, ऑनलाइन पोर्टल आणि सर्व्हरच्या सततच्या खंडित सेवांमुळे लाखो लाभार्थी महिलांना तासन्तास वाट पाहावी लागत आहे. अमरावती सह राज्यभरातील सेवा केंद्रांवर गर्दी वाढली असून, शासनाने तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.*

*मोठ्या गाजावाजाने १५ महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या या योजनेतून महिलांना दरमहा १,५०० रुपयांचे अनुदान मिळते. मात्र, नव्या नियमांनुसार ई-केवायसी अनिवार्य झाल्याने महिलांचा समावेश धोक्यात आहे. सेवा केंद्रांवर (आपले सरकार, महा ई-सेवा) गर्दी वाढली असून, अनेक महिला रात्रंदिवस मोबाइलवर प्रयत्न करत आहेत. अमरावती शहरातील ई-सेवा केंद्रांवर महिलांच्या रांगा लागल्या आहेत. आधार नंबर टाकला की एरर, ओटीपी आलं तरी एंटर करण्याचा पर्याय नाही, अशी तक्रार अनेक जण करत आहेत.*

*महिलेचे आणि पतीचे किंवा वडिलांचे आधार कार्ड, ओटीपी-लिंक्ड मोबाइल आवश्यक आहे. मात्र, पोर्टल सतत क्रॅश होत असल्याने प्रक्रिया पूर्ण होत नाही. पुण्यातील एका सेवा केंद्राचे व्यवस्थापक म्हणाले, दिवसाला शेकडो महिलांना मदत करतो, पण सर्व्हर डाउन असल्याने ७० टक्के प्रयत्न अपयशी ठरतात. राज्यभरातील महिलांसाठी हे मोठे संकट ठरले आहे.*




### विधवा महिलांचा गोंधळ

विधवा किंवा परित्यक्ता महिलांसाठी दुसऱ्या आधार कार्डचा पर्याय काय ? शासनाने स्पष्ट मार्गदर्शन न दिल्याने त्या हवालपट्टीच्या अवस्थेत आहेत. शहरातील एका विधवा महिलेच्या मते, कोणाचा आधार वापरू? हेल्पलाइनवर उत्तरच मिळत नाही. विभागाने विशेष हेल्पलाइन आणि व्हिडीओ ट्यूटोरियल जारी करावेत.

# रस्त्याने जाणाऱ्या मेंढ्यांच्या कळपाला वाहनाची धडक:१२ मेंढरे ठार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११** अकोट - अंजनगांव महामार्गावर अकोटच्या दिशेने जात असताना रुईखेड फाट्यासमोर बुधवारी रात्री एक वाजेच्या सुमारास जनुना येथील बन्सी मदने यांच्या मालकीच्या मेंढ्याचा कळप चारा शोधण्यासाठी अकोटकडे जात असताना रुईखेड फाटानजीक पिकअपने वाहनाने मागील मेंढरांना धडक दिल्यानंतर घाबरलेल्या चालकाने आला त्याच दिशेने वाहन मेंढराच्या कळपात पलटवून चक्क मेंढारांच्या अंगावरून पुन्हा अंजनगावाच्या दिशेने नेले यात चाका खाली अनेक मेंढराचा मृत्यू झाला.मेंढापाळाचा मुलगा संदीप मदने याच्या डाव्या पायावरून त्या गाडीचे चाक गेल्याने तोही किरकोळ जखमी झाला.यावेळी अकोट ग्रामीण पोलिस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली वासुदेव ठोसरे गिरधर चव्हाण सागर नागे पंकज पांडव यांनी घटनास्थळ पंचनामा केला. अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# गोवंश तस्करीचा ट्रक पकडला

## १८ लाखांचे २९ जनावरे ताब्यात



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११ अमरावती**

आज दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता दरम्यान, शहरातील नागपुरी गेट पोलीस स्टेशनच्या हद्दीत गोवंश तस्करी करणारा एक ट्रक पकडण्यात आला. ही कारवाई राजपूत धाबा ते लालखडी रोड दरम्यान करण्यात आली.

पोलिसांनी ट्रकमधून २९ गोवंश जनावरे ताब्यात घेतली असून, त्यांची अंदाजे बाजारमूल्य १८ लाख इतकी आहे. घटनास्थळी पोलिसांनी एक आरोपीला ताब्यात घेतले असून, इतर दोन आरोपी अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले आहेत. त्यांच्या शोधासाठी पोलीस पथक कार्यरत आहे.सदर प्रकरणात गोवंश संरक्षण कायद्यानुसार आणि अन्य संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रक जप्त करण्यात आला असून, जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे.पुढील कायदेशीर कारवाई सुरु असून, नागपुरी गेट पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# नगराध्यक्ष नगरसेवक पदाकरिता इच्छुक उमेदवारांनी शुल्कासह अर्ज दाखल करा

## जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

राज्यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुका लवकरच जाहीर होणार असल्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नगर पंचायत, नगरपालिका अध्यक्षपद तसेच सदस्य पदासाठी आरक्षण निश्चित झाले आहे.या निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत येत आहे याकरता इच्छुकांनी शुल्कासह अर्ज दाखल करण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केलेले आहे ,सदर अर्ज हे पक्षाच्या शहराध्यक्ष यांच्याकडे उपलब्ध आहे,सदर अर्ज जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात किंवा शहराध्यक्ष त्यांच्याकडे जमा करावे व,अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्रे जोडणे बंधनकारक असून, आरक्षण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हा निवड मंडळाच्या बैठकीबाबत पुढील सूचना देण्यात येतील.अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारिख दि.२०/१०/२०२५ ही राहील .अशी माहिती जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी दिली.



### नगरपालिका व नगर पंचायतीच्या निवडणुका साठी काँग्रेस सज्ज

पदखुला प्रवर्गराखीव प्रवर्ग (अनु.जाती, अनु.जमाती व महिला)नगर परिषद अध्यक्ष ५,००० - खुला प्रवर्ग-२,५०० -राखीव प्रवर्ग (अनु.जाती, अनु.जमाती व महिला)नगर परिषद सदस्य-२,००० खुला प्रवर्ग-१,००० राखीव प्रवर्ग (अनु.जाती, अनु.जमाती व महिला)नगर पंचायत सदस्य-१,५०० खुला प्रवर्ग-७५० राखीव प्रवर्ग (अनु.जाती, अनु.जमाती व महिला)

# जि. प., पं. स. निवडणुकीसाठी आरक्षण सोडत सोमवारला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती :** राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार अमरावती जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी आरक्षणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी आशिष येरेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिलांसाठीच्या जागा निश्चित करण्यासाठीची आरक्षण सोडत सोमवारी (१३ ऑक्टोबर) जिल्हा आणि तालुकास्तरावर आयोजित करण्यात आली आहे.जिल्हा परिषदेच्या जागांसाठीची आरक्षण सोडत दि. १३ ला सकाळी १०.३० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे काढण्यात येणार आहे.याच दिवशी सकाळी १०.३० वाजता धारणी, चिखलदरा, अंजनगांव सुर्जी, चांदुर बाजार, वरुड, तिवसा, अमरावती, धामणगांव रेल्वे आणि नांदगांव खंडेश्वर या पंचायत समित्यांची आरक्षण सोडत संबंधित तहसिल कार्यालयांमध्ये घेण्यात येईल. तर, दुपारी ३ वाजता दर्यापूर, अचलपूर, मोर्शी, भातकुली आणि चांदुर रेल्वे या पंचायत समित्यांची सोडत संबंधित तहसिल कार्यालयांमध्ये काढली जाईल. जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीच्या या आरक्षण सोडत कार्यक्रमास ज्या रहिवाशांना उपस्थित राहायचे आहे, त्यांनी वरील नमूद ठिकाणी व वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.




# बनावट 'RTO चालान' मेसेजद्वारे फसवणुकीचा प्रयत्न

## नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती -** सध्या अनेक नागरिकांच्या मोबाईलवर ठढज चालान भरावा, वाहन दंड भरा अशा आशयाचे मेसेज येत असून, यात दिलेल्या लिंकवर क्लिक केल्यास फसवणुकीचा धोका निर्माण होतो. हे मेसेज सहसा अनोळखी क्रमांकांवरून येतात आणि त्यातील लिंक ओपन केल्यास बनावट ॲप्स डाउनलोड होतात. या ॲप्सद्वारे तुमची वैयक्तिक माहिती, बँक तपशील, पासवर्ड आणि जढझ चोरले जातात.सायबर गुन्हेगार अशा माध्यमातून आर्थिक फसवणूक करत असून, नागरिकांनी कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, तसेच प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरबाहेरील ॲप्स डाउनलोड करू नयेत.फसवणूक झाल्यास किंवा संशयास्पद मेसेज प्राप्त झाल्यास, नागरिकांनी त्वरित सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० किंवा १९४५ वर संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवता येते.सायबर तज्ज्ञ व पोलिस प्रशासनाने नागरिकांना अशा फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.




# श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम येथे पाणपोई व स्मार्ट मीटर जनजागृती स्टॉलचे उद्घाटन

## राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथीनिमित्त महावितरणचा सामाजिक उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११गुरुकुंज मोझरी**

अखिल विश्वाला शांतीचा, मानवतेचा आणि धर्मनिरपेक्षतेचा संदेश देणारे स्वातंत्र्यसेनानी वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. देश विदेशातून येथे भाविक मोठ्या संख्येने येत असतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) तर्फे सामाजिक बांधिलकी जपत भाविकांच्या सोयीसाठी पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. सदर पाणपोईचे उद्घाटन अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री अशोक साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता श्री दीपक देवहाते (अमरावती मंडल), अधीक्षक अभियंता (पा.आ.) सौ. दिपाली माडेलवर, कार्यकारी अभियंता श्री प्रफुल्ल लांडे, तसेच अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाचे सर्वाधिकारी लक्ष्मणजी गमे गुरुजी आदी मान्यवर उपस्थित होते.हा उपक्रम महावितरणचे कर्मचारी श्री गणेश घाटोळ यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला असून, भाविकांना शुद्ध व थंड पिण्याचे पाणी सहज उपलब्ध व्हावे यासाठी पाणपोईची व्यवस्था करण्यात आली आहे.यासोबतच भाविक आणि ग्राहकांमध्ये तांत्रिक जाणीव वाढविण्यासाठी स्मार्ट ढजऊमीटर जनजागृती स्टॉल देखील उभारण्यात आला. या स्टॉलचे उद्घाटन श्री पवनकुमार केडिया जिनस कंपनीचे उपाध्यक्ष यांच्या उपस्थितीत व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.विदर्भातील अमरावती,यवतमाळ, अकोला, वाशिम, बुलढाना येथे जिनस कंपनीचे स्मार्ट ढजऊ मीटर लावण्यात येत आहे. सदर स्टॉल जिनस कंपनी तर्फे उभारण्यात आला असून, वीज ग्राहकांच्या मनात स्मार्ट ढजऊ मीटरविषयी असलेल्या शंकांचे निरसन आणि त्याची उपयुक्तता समजावून देण्यासाठी माहितीपर फलक, प्रत्यक्ष जुने व नवे मीटरचे नमुने प्रदर्शित करण्यात आले.या वेळी अशोक साळुंखे यांनी सांगितले की, स्मार्ट ढजऊ मीटर हे ऊर्जासंवर्धन आणि पारदर्शक वीजबिल प्रणालीकडे जाणारे एक पाऊल आहे. या माध्यमातून ग्राहकांना त्यांच्या वापरावर अधिक नियंत्रण मिळेल.

राष्ट्रसंतांच्या पुण्यस्मरण सोहळ्यात महावितरणच्या या सामाजिक आणि जनजागृतीपर उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.





# भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांचा दिल्ली दौरा चर्चेत

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी भेटीनंतर नवी जबाबदारी मिळण्याची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११नागपूर-** महाराष्ट्र भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नुकताच दिल्ली दौरा केला असून, या दौऱ्यात त्यांनी केंद्रातील अनेक महत्त्वाच्या नेत्यांची भेट घेतली. विशेषतः केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी झालेल्या भेटीनंतर राज्यातील आणि राष्ट्रीय स्तरावरील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या भेटीमुळे आगामी काळात मुनगंटीवार यांना पक्षात नव्या जबाबदाऱ्या मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दिल्ली दौऱ्यादरम्यान मुनगंटीवार यांनी सर्वप्रथम अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, मी दिल्लीला मंत्रीपदासाठी किंवा कोणत्याही पदासाठी आलो नाही. राज्यातील अनेक महत्त्वाचे प्रश्न केंद्रापर्यंत पोहोचवण्यासाठी या भेटी घेतल्या आहेत. ते म्हणाले की, राज्यात काही ठिकाणी द्वेष आणि धार्मिक असहिष्णुतेचे वातावरण निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत गृहमंत्री म्हणून अमित शाह यांच्यावर कायदा-सुव्यवस्था टिकवण्याची जबाबदारी आहे, आणि ते या बाबीकडे नक्की लक्ष देतील, असा मला विश्वास आहे. मुनगंटीवार यांनी सांगितले की, मी सध्या मंत्रिमंडळात नाही यामागे पक्षाचे काही मोठे नियोजन आहे. पक्षावर पूर्ण विश्वास आहे आणि योग्य वेळ आल्यावर निर्णय घेतला जाईल.

### नव्या जबाबदारीची शक्यता

भाजप सूत्रांच्या माहितीनुसार, अमित शहा यांच्यासोबत झालेल्या चर्चेत केवळ राज्यातील प्रशासनिक किंवा विकासाच्या मुद्द्यांवरच नव्हे, तर काही महत्त्वाच्या राजकीय घडामोडींवर देखील चर्चा झाली. महाराष्ट्रात आगामी काही महिन्यांत होऊ शकणाऱ्या राजकीय फेरबदलांच्या पार्श्वभूमीवर या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**बांबू संशोधन संस्थेचा तिरंगा आणि डायरी भेट**

या भेटीच्या वेळी मुनगंटीवार यांनी अमित शहा यांना चंद्रपूर जिल्ह्यातील बांबू संशोधन संस्थेत तयार केलेला विशेष तिरंगा ध्वज आणि एक हस्तनिर्मित डायरी भेट दिली. मुनगंटीवार हे बांबू मिशन आणि पर्यावरण क्षेत्रातील त्यांच्या कामासाठी ओळखले जातात. या भेटीमुळे केवळ राजकीय नाही, तर सामाजिक आणि पर्यावरणीय चर्चाही रंगल्या आहेत. मुनगंटीवार यांनी सांगितले की, बांबू संशोधन संस्था ही भारतासाठी एक अभिमानाचा विषय आहे. आम्ही स्थानिक कारागिरांच्या कौशल्याचा उपयोग करून देशभक्तीची भावना जागवण्याचं काम करत आहोत. अमित शहा यांना या उपक्रमाची माहिती देऊन त्यांचं मार्गदर्शन घेतले.

### महाराष्ट्रातील संघटनात बदल

राजकीय तज्ज्ञांच्या मते, सुधीर मुनगंटीवार हे संघटनात मजबूत पकड असलेले आणि कार्यकर्त्यांशी थेट संवाद ठेवणारे नेते आहेत. त्यामुळे पक्षात त्यांना लवकरच काही महत्त्वाची जबाबदारी देण्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. काहींचे मत आहे की, आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील संघटनात बदल होत असून, त्यात मुनगंटीवार यांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते.

# शेतकरी वृद्धावर विळ्याने प्राणघातक हल्ला

## रहिमापुर चिंचोली पोलीस ठाण्यात आरोपींवर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. ४ अंजनगाव सुर्जी-** रहिमापुर पोलीस स्टेशनच्या हद्दीत अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहीगाव येथे शेतीच्या रस्त्याच्या वादातून ७१ वर्षीय शेतकरी वृद्धाला आणि त्याच्या पत्नीला मारहाण करून जखमी करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी एका जणांविरुद्ध रहिमापुर चिंचोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना ८ आक्टोबंर रोजी सकाळी साडे आठच्या सुमारास विहीगाव शिवारातील शेत गट क्रमांक २८/४ मधील शेताजवळ घडली. फिर्यादी वृद्ध शेतकरी मधुकर हागोणे (वय ७१, शेतकरी, रा. विहीगाव ) आणि त्यांची पत्नी आशा हागोणे यांना आरोपींनी मारहाण केली. आरोपींमध्ये शिवाजी भाबुरकर यांचा समावेश आहे. आरोपी विहीगाव येथील रहिवासी असून, फिर्यादी आणि आरोपी हे एकाच गावचे आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि आरोपींमध्ये शेतीच्या रस्त्याचावाद व आरोपीने शेत रस्त्याच्या मध्यभागी बैल बंडी सोडली होती फिर्यादीने बैल बंडी रस्त्यांच्या कडेला लाव म्हटल्याने८ आक्टोबंर रोजी सकाळी आरोपींनी बेकायदेशीरपणे फिर्यादीच्या शेतातून बैल बंडी घेऊन जात होता फिर्यादीने बैल बंडी अडवली असता वृद्ध शेतकरी मधुकर हागोणे यांच्यावर हल्ला केला. त्यांनी फिर्यादीला, तु चोटटा आहेस तू आमच्या शेतात इकडे तिकडे फिरत असा जाब विचारत शिवीगाळ सुरू केली. यानंतर आरोपीने विळ्याने हातांवर वार करून गंभीर जखमी केले शेतकरी वृद्ध मधुकर हागोणे यांच्या, डाव्या पायाच्या घोट्याजवळ,



उजव्या पायावर, हातावर आणि तोंडावर मारहाण करून गंभीर दुखापत केली.

पत्नी आशा हागोणेला सुद्धा ओळवाळ करून शिवीगाळ केली.या प्रकरणी मधुकर हागोणे यांनी ८ आक्टोबंर रोजी सायंकाळी रहिमापूर चिंचोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक अनंत वडतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कारवाई सुरू आहे.

# महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनच्या अध्यक्षपदी प्रवीणसिंह परदेशी यांची निवड

### अमरावतीमध्ये नोव्हेंबर महिन्यात आयोजन


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती-** अमरावतीमध्ये होणाऱ्या ३८ व्या महाराष्ट्र राज्य तथा तिसऱ्या अखिल भारतीय पक्षीमित्र संमेलनाच्या अध्यक्षपदी राज्य नियोजन संस्थेचे अध्यक्ष प्रवीण परदेशी (ख-ड ठींव.) यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र पक्षिमित्राचे किशोर गठडी यांनी दिली. अमरावती येथील वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेकडे (थएउड) यंदा यजमानपद आहे.

पक्षीमित्रांची संघटन असलेली महाराष्ट्र पक्षीमित्र ही संस्था राज्यात गेली चार दशके कार्यरत आहे. पक्षी अभ्यास, संवर्धन व जनजागृती यासाठी कार्यरत असलेल्या या संस्थेची राज्यस्तरीय तसेच विभागीय स्तरावर पक्षीमित्र संमेलने होतात. अशा प्रकारचे संघटन आणि पक्षीमित्रांचे संमेलने घडवून आणणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असल्याचे गठडी यांनी सांगितले.

### छायाचित्रकार म्हणून छाप

संमेलनाध्यक्ष प्रवीणसिंह परदेशी हे त्यांच्या प्रशासकीय सेवेच्या सुरुवातीपासूनच वन्यजीव व पक्षी छायाचित्रकार व वन्यजीव संवर्धक म्हणून संपूर्ण राज्यात परिचित आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसन तसेच राज्याच्या वन विभागाचे सचिव असताना



त्यांनी वन विभागात अतिशय धडाडीने काम करून जंगल व वन्यजीव संवर्धनात आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता. महाराष्ट्र पक्षीमित्र सोबत ते गेल्या ३ दशकांपासून जुळलेले असून त्यांनी अनेक संमेलनात उपस्थित राहून तसेच संमेलनाच्या आयोजनात सुद्धा मोलाची भूमिका बजाविली होती. सध्या ते वन्यजीव क्षेत्रातील सर्वात जुन्या अशा बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष सुद्धा आहेत.

### असे होईल संमेलन

संपूर्ण राज्यात आजवर ३७ राज्यस्तरीय संमेलने व विभाग स्तरावरील ३० संमेलनांचे आयोजन आजवर करण्यात आले आहेत. यावर्षी अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात ०१ आणि ०२ नोव्हेंबर २०२५ दरम्यान हे संमेलन होत आहे. या संमेलनाच्या पूर्वी स्थानिक स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन सुद्धा आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या संमेलनासाठी संपूर्ण राज्यातून व राज्याबाहेरून किमान ३०० प्रतिनिधी या संमेलनासाठी उपस्थित राहतील असा अंदाज आहे. संमेलनात विविध चर्चासत्रे, सादरीकरणे, परिसंवाद, प्रकट मुलाखत व राज्याबाहेरील सहभागींचे बहुभाषिक सत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. संमेलनाचा भाग म्हणून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे 'विद्यार्थी पक्षीमित्र संमेलन', विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा तसेच पक्षी छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेतर्फे दिले जाणारे पुरस्कार तसेच विविध स्पर्धांच्या पुरस्कारांनी मान्यवरांना गौरवण्यात येणार आहे.

### येथे साधा संपर्क

संमेलनाला जोडून एक दिवस अगोदर पक्षी या विषयावर कार्यशाळा तसेच संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मेळघाट सहलींचे आयोजन सुद्धा करण्यात येणार आहे. या संमेलनास राज्यातून तसेच राज्याबाहेरील सुमारे तीनशे प्रतिनिधी यांची उपस्थिती अपेक्षित आहे. संमेलनाची व सबंधित कार्यक्रमांच्या नोंदणी बाबतची माहिती महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या ु.रिज्ञीहळाळींीर.ंीस या वेबसाइटवर तसेच विविध माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी आयोजक वेक्स या संस्थेशी ९८३४९१२९०४, ९९२३९१००३४ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

# अकोल्यात खुल्या जागेत दारू पिणाऱ्या १११ जणांवर गुन्हे दाखल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.११अकोला-** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि समाजामध्ये शांतता व सुरक्षिततेचा संदेश देण्यासाठी अकोला पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली. खुल्या जागेत मद्यप्राशन करणाऱ्या १११ इसमांवर कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

रात्री ९ ते ११ वाजेच्या दरम्यान अकोला शहरातील विविध ठिकाणी पोलिसांच्या पथकांकडून एकाच वेळी धडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेमध्ये अंमली पदार्थ विरोधी पथक, स्थानिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, स्थानिक पोलीस ठाण्यांचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहभाग घेतला. कारवाईदरम्यान, अकोला शहर व परिसरात खुल्या



ठिकाणी दारू पिणाऱ्या व्यक्तींना ताब्यात घेऊन त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात आली. यामध्ये मुख्यतः गांधी रोड, जुनी कळी, झोपडपट्टी भाग, स्टेशन परिसर आणि इतर ठिकाणांचा समावेश होता. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांकडून अशा प्रकारच्या मोहिमा राबवण्यात येणार आहेत. नागरिकांनी कायदा पाळावा, कुठलीही गोंधळ घालू नये. सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणे गुन्हा असून याविरोधात पोलिसांची कारवाई कठोर राहील. या कारवाईतून पोलिसांनी एक स्पष्ट संदेश दिला आहे की, अकोलामध्ये कायदा हातात घेणाऱ्यांवर अजिबात दयाभाव दाखवला जाणार नाही. नागरिकांनी शांतता आणि सामाजिक सौहार्द राखावे, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# राकेश तिवारी यांच्यावर गुन्हा दाखल करा: महाविकास आघाडीची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.११ बुलडाणा -** बुलडाणा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ व्यक्तीवर नव्हे, तर भारतीय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर झालेला हल्ला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून दिलेल्या धर्मनिरपेक्षेतेवर हा हल्ला आहे. एकीकडे मूलभूत अधिकार मागणाऱ्या सोनम वांगचूक यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केल्या जातो तर दुसरीकडे ज्यांनी देशाच्या न्यायव्यवस्थेवर हल्ला चढवला त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला जात नाही? ही न्यायव्यवस्थेची खिल्ली तर लोकशाहीची हत्या आहे,



अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत महाविकास आघाडीच्या वतीने आज धरणे आंदोलन करत राष्ट्रपती यांच्या नावाने निवेदन देण्यात आले. वकील राकेश तिवारी यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा अधिनियामाअंर्तगत देशद्रोहासारखे कडके गुन्हे दाखल करुन त्यांना अटक करण्यात यावी, अशी मागणीच निवेदनातून करण्यात आली. यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे, उबाठा जिल्हा संपर्क प्रमुख नरेंद्र खेडेकर, आमदार सिद्धार्थ खरात, शिवसेना प्रवक्त्या ॲड. जयश्री शेळके,जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार जिल्हा कार्याध्यक्ष प्रसेनजीत पाटील, नरेश शेळके, प्रदेश सरचिटणीस श्याम उमाळकर, सतीश मेहेंद्रे, सुनील सपकाळ, डॉ. इसरार, दिलीप जाधव, गणेश पाटील, ॲड. अनंतराव वानखेडे, प्रा. राजू गवई, डॉ. ज्योती खेडेकर, ईश्वरराव इंगळे, रामभाऊ खेडेकर उपस्थित होते.

# बेंबळा कालव्याची भिंत पुन्हा खचली; दुरूस्तीकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष

## झाडे झुडपे उगवल्याने अपघाताचा धोका; तत्काळ दुरुस्तीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११यवतमाळ-** तीन महिन्यांपूर्वी दुरुस्त केलेली बेंबळा नदी प्रकल्पाच्या मुख्य कालव्याची भिंत पुन्हा खचल्याने शेतकऱ्यांचा शेतात जाण्याचा रस्ता बंद झाला आहे. या प्रकाराला महिना लोटला, मात्र पाटबंधारे विभागाने अजूनही काही उपाययोजना केली नाही. कालव्याच्या सिमेंट स्तरापासून अवघ्या चार फूट अंतरावरच भिंत कोसळल्याने कालव्याला मोठे भगदाड पडले आहे. तसेच शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकारामुळे मुख्य कालव्याची भिंत दुरुस्त न करता केवळ दुरुस्तीचा देखावा केल्याचे दिसून येते. यावर पाटबंधारे विभागाने वेळीच लक्ष देण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे. बेंबळा नदी प्रकल्पाचा मुख्य कालवा गिमोणा गावाजवळून पुढे गेला आहे. या कालव्यालगत अंबादास जांभूळकर यांच्या शेताजवळची भिंत गत मे महिन्यात दरड कोसळावी त्याप्रमाणे खचत चालली होती. त्यावर उपाय म्हणून पाटबंधारे विभागाने त्यात



मुरूम भरून थातूरमातूर दुरुस्ती केली. याचे बिल मात्र लाखोच्या घरात आले. तीच भिंत अवघ्या तीन महिन्यातच पुन्हा खचली आहे. आता स्थिती पूर्वीपेक्षाही भयावह झाली आहे. याठिकाणी झुडपे उगवल्याने येथून येणाऱ्या जाणाऱ्या शेतकऱ्यांसाठी धोक्याचे झाले आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांसाठी असलेला रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. या भिंतीच्या व जांभूळकर यांच्यासह इतरांच्या शेतादरम्यान नाला आहे. त्यामध्ये ही भिंत सरकत असल्याचे दिसून येत आहे. मुख्य कालव्याला सिंचनासाठी पाणी सोडल्यानंतर याच ठिकाणाहून पाणी झिरपून त्या नाल्यामध्ये साचते. त्यामुळे मुख्य कालव्याला आतमधून भगदाड पडले की काय, असा अंदाज शेतकरी व्यक्त करीत आहेत. आता तर कालव्याची भिंतच कोसळल्याने यापुढे पाणी सोडल्यास मुख्य कालवा फूटून शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरेल व कालव्यालगतच्या सर्व शेतकऱ्यांची शेतजमीन तलावात रूपांतरित होईल. अशी भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. या गंभीर प्रकाराकडे पाटबंधारे विभागाने तत्काळ लक्ष देऊन भिंत व कालव्याची दुरुस्ती योग्य पद्धतीने करावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

# दैदिप्यमान, अभूतपूर्व व ऐतिहासिक विजयोत्सव

## श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे विद्यापीठ युवा महोत्सव २०२५ मध्ये सलग पाचव्यांदा सर्वसाधारण विजेतेपद

## सांस्कृतिक क्षेत्रातील विज्ञान महाविद्यालयाची कामगिरी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे द्योतक – प्राचार्य डॉ. जी व्ही कोरपे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आयोजित 'युवा स्पंदन' – युवा महोत्सव २०२५ मध्ये पुन्हा एकदा इतिहास घडवत श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीने सलग पाचव्यांदा सर्वसाधारण विजेतेपद पटकावले आहे. या उल्लेखनीय कामगिरीने महाविद्यालयाने पुन्हा एकदा आपली कला, संस्कृती आणि प्रतिभेची परंपरा उजळविली आहे व अमरावती शहराचा आणि शिवाजी शिक्षण संस्थेचा अभिमान वाढविला आहे.

या युवा महोत्सवाचे आयोजन श्री गणेशदास राठी छात्रालय समिती, अमरावती यांच्या वतीने आणि श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.बक्षिस वितरण आणि समारोप समारंभ दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी श्री गणेशदास राठी विद्यालयाच्या मुख्य रंगमंचावर झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. मिलिंदजी बारहाते, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्र–कुलगुरू डॉ. महेंद्रजी ढोरे, मा.



श्री. वसंतकुमारजी मालपाणी, अध्यक्ष, श्री गणेशदास राठी छात्रालय समिती आणि मा. डॉ. गोविंदजी लाहोटी, सचिव, श्री गणेशदास राठी छात्रालय समिती, हे मान्यवर प्रमुख उपस्थितीमध्ये होते. मा. डॉ. प्रविण रघुवंशी, व्यवस्थापन परिषद सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विशेष उपस्थित होते.

स्पर्धांमध्ये श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने प्रभावी कामगिरी करत ५ प्रथम, ८ द्वितीय आणि ३ तृतीय पारितोषिके मिळवून अशी एकूण १६ पारितोषिके प्राप्त करून सर्वसामान्य विजेतेपद आपल्या नावे केले. वादविवाद, वक्तृत्व, फोटोग्राफी, ऑन द स्पॉट पेंटिंग, पोस्टर मेकिंग या पाच स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक; एकांकिका, क्विझ, कोलाज, कार्टूनिंग, स्थापना, मेहंदी, माती कला आणि पश्चिमात्य वाद्य या आठ स्पर्धांमध्ये मध्ये द्वितीय क्रमांक; तर मिमिक्री, कव्वाली आणि लोकनृत्य या तीन स्पर्धांमध्ये तृतीय क्रमांक पटकावले.या अभूतपूर्व आणि ऐतिहासिक कामगिरीबदल महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय सचिव डॉ व्ही जी ठाकरे यांनी सर्व घटकांचे कौतुक करून अभिनंदन केले.

> श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे हे यश केवळ स्पर्धेतील पारितोषिकांचे नाही, तर संस्थेच्या मूल्यांचे, संस्कारांचे आणि संघभावनेचे प्रतिबिंब आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देते आणि हेच सातत्य आज विजयाच्या रूपाने फुलत आहे. या यशामागे प्रत्येक विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी आणि प्राचार्यांचे समर्पण आणि संस्थेचा प्रेरणादायी वारसा कार्यरत आहे. या सर्व घटकांचे हार्दिक अभिनंदन आणि अशा अनेक विजयासाठी संस्थेच्या कोटी कोटी शुभेच्छा.
>
> **– श्री हर्षवर्धन देशमुख,**
> **अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती**

संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. शुभांगी गावंडे आणि डॉ. मनीष गायकवाड यांनी उत्कृष्ट समन्वय साधत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य दिशा दिली. चमूचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. रेखा मग्गीरवार आणि डॉ रुपाली इंगोले यांनी प्रमुख कार्य पार पडले. तर संगीत गटाचे डॉ. हर्षली वानखेडे, कु. दीपाली राठोड, कु. अवंतिका मानकर आणि श्री. सुकृत चौधरी यांनी केले. नृत्य विभागाचे प्रभारी डॉ. अविनाश दारसिंबे, डॉ. कविता वाघ आणि श्री. कार्तिक तिवारी होते. साहित्य विभागासाठी डॉ. मनीष गायकवाड आणि डॉ. स्वप्नील अरसड, तर रंगभूमी कलाप्रकारासाठी डॉ. दिनेश खेड़कर, डॉ. स्वप्नील अरसड, डॉ. मनीष गायकवाड, डॉ. योगिता ठाकरे, डॉ. वंदना खोब्रागडे आणि डॉ. मयुरा देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ललितकला विभागाचे प्रभारी डॉ. रुपाली इंगोले, डॉ. शुभांगी गावंडे, डॉ. श्रुती इंगोले आणि डॉ. अनुजा मोपारी होते. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने सलग पाचव्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद मिळवत आपल्या अखंड परंपरेचा झेंडा पुन्हा एकदा उंचावला आहे.या शानदार यशाबद्दल सर्व विद्यार्थी, मार्गदर्शक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयीन परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. सलग पाचव्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद पटकावून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने पुन्हा एकदा दाखवून दिले की – उत्कृष्टता ही सवय नाही, ती संस्कार आहे!

# काँग्रेस पक्षानेच सामाजिक सौहार्द व सलोख्याचे संरक्षण केले – किशोर बोरकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**



आज देशात भाजपचे बहुमताने सरकार असतांना, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी भाजपाला अपयश आले आहे.समान नागरी कायदाचे समर्थन करणारी भाजपा,एका विशिष्ट समाजाला टार्गेट करून समाजा,समाजात तेढ निर्माण करून मनु विचारसरणी रूजविण्याचा प्रयत्न करीत असुन त्या भावनेतूनच सरन्यायाधीश भुषण गवई यांचेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्या गेला, काँग्रेस पक्षाने देशात सामाजिक सौहार्द व सलोख्याचे संरक्षण केले असल्यामुळे काँग्रेसच्या सत्ता काळात आजच्या सारखी अराजकता नव्हती,आज देशात सामाजिक आरोग्य व अमरावती शहरातील नागरिकांचे मानसिक व शारीरिक आरोग्य धोक्यात आल्यामुळे आपण काँग्रेस पक्षाला महानगरपालिकेत सत्तास्थानी करण्यासाठी मदत करण्याची विनंती, स्थानिक रुख्मिणी नगर,फ्रेजरपुरा प्रभागातील रूक्मिणीनगर येथील, नेताजी क्रीडा मंडळाने आयोजित केलेल्या, महानगरपालिका निवडणूकीचा पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या बैठकीत प्रभागाचे निरीक्षक,तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केली आहे.

ते पुढे म्हणाले कि, सत्ताधाऱ्यांच्या मनपातील भष्टाचामुळे शहरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असून गेल्या दोन वर्षांपासून काँग्रेस पक्षाकडून मनपा व जिल्हा प्रशासनावर आंदोलने व मोर्चे काढून सुध्दा शासनाने शहरातील साफसफाईचा मुद्दा विचारात घेतला नाही,शेवटी मा.उच्च न्यायालयाला दखल घ्यावी लागली.सत्ता पक्षातील लोकप्रतिनिधीच साफसफाईच्या कामाचे कंत्राट नियंत्रित करीत असल्यामुळेच प्रशासकीय व्यवस्थेवर लोकप्रतिनिधींच दबाव आणुन मनपाच्या करोडो रुपयांच्या निधीवर डल्ला मारल्या गेल्याचा आरोप किशोर बोरकर यांनी केला आहे.कॉगेस पक्षाच्या सत्ताकाळात शहरातील नागरिकांनी एवढ्या मोठ्या समस्येला कधीही सामोरे जावे लागले नाही, व डॉ सुनिल देशमुख यांच्या काळात,सुपर स्पेशालिटी,आक्सीजन पार्क,गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेचे अद्यावत सुविधेसह प्रशिक्षण केंद्र,व उडाण पुलामुळे आज शहरातील नागरिक चांगल्या प्रकारे या सुविधांचा उपभोग घेत असल्याचे स्मरण याप्रसंगी किशोर बोरकर यांनी उपस्थितांना करून दिले. याप्रसंगी,माजी नगरसेवक नितीन देशमुख, मराठा महासंघाचे उपाध्यक्ष भैय्या निचळ अमरावती तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख सौ.जयश्री डाहाके,पंकज मेश्राम,विजय खंडारे,श्रीमती, वंदना थोरात व हेमंत वानखेडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी सतिश काळे, बबनराव सोलीव, सुरेश अतकरे,तेजस डोके, राजेंद्र लोणारे लक्ष्मणराव अवटीक,दिनेश देशमुख, शारदा माणके,अनिला काझी,नेहा बागडे, कल्पना सिरसाठ,चंदा हमारे,सौ.मिनाक्षी बनसोड,विकास देशमुख अंकुश डाहाके,किरणे स्वामी,तुषार राऊत,सचिन भणंग,व प्रशांत तुरखेडे,व या परीसरातील नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन अमरावती शहर महीला काँग्रेसच्या सौ.शिल्पा राऊत यांनी केले.

# मोर्शीत कृषी केंद्र व्यावसायिकांचा 'साथी'ला विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मोर्शी**



मोर्शी बियाणे विक्री साखळीतील उत्पादक कंपनी ते वितरक आणि किरकोळ विक्रेता अशा सर्वांनाच साथी पोर्टलवर नोंदीची सक्ती करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील अडचणींचा आढावा न घेताच ड्रीम प्रोजेक्टच्या नावाखाली बियाणे विक्रेत्यांवर हे नाहक साथी ॲप थोपविले जात असल्याचा आरोप नेहरपिंगळाई येथील कृषी व्यवसाय धारकांनी केला आहे त्यामुळेच या साथी ॲपचा विरोध केलेला आहे.बियाणे वितरणातील सर्व टप्प्यांवर नोंदणीची सक्ती केली आहे. उत्पादक कंपनीपासून ते गावस्तरावरील कृषी सेवा केंद्रधारक या सर्वांनाच या प्रणालीत बियाणे विक्रीची नोद घ्यावी लागेल. यात ब्रीडर सीड ते बीजोत्पादन अशा विविध टप्प्यांवर बियाणे कंपन्याना ऑनलाईन माहिती नोंदवावी लागणार आहे. परंतु फसवेगिरी कंपन्यांच्या स्तरावर होत असल्याने त्यांनाच साथी पोर्टलवर नोंदणीची सक्ती अपेक्षित होती. परंतु यामध्ये महाराष्ट्रातील कृषी व्यावसायिकांना नाहक भरडल्या जात आहे.

ग्रामीण भागातील ७० टक्के विक्रेत्यांकडे कामकाजासाठी संगणक नाही. नेटवर्क व्यवस्थित चालत नाही. त्यांना ऑनलाईनबद्दल तज्ज्ञ व्यक्ती नाही, या सर्व गोष्टीचा विचार शासनाने करावा लागत होता. ग्रामीण भा गात आजही भारनियमन व विजेच्या समस्या आहेत. सरकारच्या धोरणाविरोधात या कृषी व्यावसायिकांनी रब्बी हंगामातील बियाणे खरेदीवर बहिष्काराचे धोरण अवलंबिले आहे. नेरपिंगळाई कृषी साहित्य संघ यांनी परवाने शासनाकडे परत करून शासनाने बियाणे व कपाशीची विक्री स्वतः करावी. आम्ही करणार नाही, असा एकमताने निर्णय घेतला आहे.

# रा. सू. गवई स्मारकाचे उद्घाटन ३० ऑक्टोबरला नियोजित

## उद्घाटनाच्या अनुषंगाने कार्यवाही पूर्ण करावीत – जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

दादासाहेब उपाख्य रा. सू. गवई यांच्या स्मारकाचे उद्घाटन दि. ३० ऑक्टोबर रोजी नियोजित करण्यात आले आहे.




त्यानुषंगाने सर्व विभागांनी परवानगी, ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, तसेच वीज, पाणी आणि स्वच्छतेची कामे प्राधान्याने करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. रा. सू. गवई स्मारकाच्या उद्घाटनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक पार पडली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, मुख्य अभियंता गिरीश जोशी, कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी यांच्यासह आदी अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी बांधकामाच्या अनुषंगाने आढावा घेतला. बांधकाम पूर्ण झालेले असले तरी उद्घाटनाच्या अनुषंगाने कोणतेही काम अपूर्ण राहू नये, तसेच सर्व परवानगी आणि ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. स्मारकाच्या पाणी पुरवठा, वीज आणि स्वच्छतेची जबाबदारी महापालिकेवर सोपविण्यात आली आहे. त्यासाठी महापालिकेने कार्यवाही करावी, तसेच स्वच्छतेसाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. स्मारकाच्या प्रवेशद्वारावरून विजेची तार गेल्याने ही वाहिनी भूमिगत करण्याबाबत शक्यता पडताळून पाहावी. तसेच संपूर्ण स्मारकामधील वीज पुरवठा सुरळीत सुरू करण्यात आला असल्याची खात्री करावी.

स्मारकाच्या ठिकाणी पाणीपुरवठा व्यवस्था करण्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी. जोडणीसाठी तातडीने प्रक्रिया करावी. स्मारकाची सुरक्षा ही महत्वाची आहे. यासाठी महापालिकेने सुरक्षा कर्मी नेमावेत. अग्निशमन यंत्रणा महत्वाची असून त्यांचेही ना हरकत प्रमाणपत्र तातडीने घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. स्मारकाच्या निमित्ताने नागरिकांसाठी सुविधा झाली असून अंतर्गत व्यवस्था राखण्यासाठी कंत्राटीतत्त्वावर तीन कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहे. तसेच स्मारकाच्या देखभाल दुरूस्तीसाठी निधीची तरतूद करण्यात येणार आहे.

रा. सू. गवई स्मारकाच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे उद्घाटन कार्यक्रमासाठी लागणाऱ्या सर्व परवानगी आणि ना हरकत घेण्यात यावी. तसेच उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन करण्याच्या सूचना श्री. येरेकर यांनी दिल्या.

# १२ ऑक्टोबरला महासम्राट बळीराजा रथयात्रा अंबानगरीत




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

महासम्राट बळीराजा राष्ट्र सेवा संघव्दारा आयोजित विदर्भ स्तरीय महासम्राट बळीराजा रथयात्राचे आगमन १२ ऑक्टोबरला सकाळी ९ वाजता पंचवटी चौक, अमरावती येथे होणार आहे.

११ ऑक्टोंबर ते १४ तीर्थक्षेत्र गुरुकुंज मोझरी ते शिवतीर्थ ऑक्टोबरपर्यंतउमरी ता. सावनेर अशी रथयात्रा अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर या चार जिल्ह्यातून ही रथयात्रा मार्गक्रमण करेल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सवात अभिवादन करून रथयात्रेचा शुभारंभ राष्ट्रीय समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज, खा. बळवंत वानखडे, आ. संजय खोडके, माजी आ. यशोमतीताई ठाकूर, माजी आ. बच्चू कडू. आ. सुलभाताईखोडके, आ. राजेश वानखडे, रवींद्र शिंदे, प्रेमकुमार बोके यांच्याहस्ते होईल. महासम्राट बळीराजा फक्त कृषी, शेतकरी नव्हे तर व्यापार, तंत्रज्ञान, विज्ञान, कला संस्कृती, सर्वधर्म समभावाची पताका घेवून बळीराजाच्या कार्याचा प्रचार प्रसार व राष्ट्रीय एकात्मकतेची भावना जागृत या हेतूने विविध संघटनांच्या सहकार्याने आयोजन केले आहे.रथयात्रेमध्ये महासम्राट बळीराजाचा मूर्तीरथ, जिजाऊ शिवबा मूर्तीरथ, झाँकी, ढोल ताशा, पथनाट्य, गाण्यांचा कार्यक्रम हे रथयात्रेचे विशेष आकर्षण असेल.

रथयात्रेसाठी अभिविलास नखाते, सेवकराम राऊत, योगराज धानोरकर, दिनेश इंगोले, नरेंद्र गद्रे, पांडुरंग भोंगाडे, प्रमोद वैद्य, उमेश कोराम, भगवान चांदेकर, सुजित मेश्राम, सचिन पराये, जितेंद्र पर्वते, प्रशांत येनगंदेवार, अथक परिश्रम घेत आहेत. पंचवटी चौक अमरावती येथे आगमन या रथयात्रेच्या स्वागतासाठी समस्त शिवप्रेमी, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, फुले, शाहू, आंबेडकर विचार मंच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संजय ठाकरे जिल्हा सचिव मराठा सेवा संघ अमरावती तथा समन्वयक बळीराजा रथ यात्रा समिती अमरावती जिल्हा यांनी केले आहे.

# शासनाच्या निष्काळजीपणाचा निषेध

## तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांचे झोळी आंदोलन,एक– एक रुपया वर्गणी करून शासनाची दिवाळी साजरी करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११तिवसा**



१ऑक्टोबर २०२५ रोजी तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांनी अनोखे झोळी आंदोलन करून एक–एक रुपया वर्गणी करून तिवसा तहसीलदार मयूर कळसे यांच्या कडे सुपूर्द केले असून यावेळी संतप्त शेतकरी यांनी तहसीलदार यांना म्हटले ही वर्गणी मुख्यमंत्री सहायता कक्ष या मध्ये पाठवून शासन दिवाळी साजरी करेल.झालेल्या शासनाकडून अतिवृष्टी ग्रस्त तालुक्यांच्या यादीत तिवसा तालुका वगळण्यात आला...अतिवृष्टीमुळे अमरावती जिल्ह्यातील अनेक तालुक्यांतील शेतकऱ्यांचे पिके व संसार उद्ध्वस्त झाले. शासनाने नुकसानीचा आढावा घेत नुकसानग्रस्त तालुक्यांची यादी जाहीर केली असता, तिवसा तालुका मात्र या यादीतून अन्याय्यपणे वगळण्यात आला. त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी व असंतोष निर्माण झाला असूनतिवसा तालुक्यातील तूर, सोयाबीन, कपाशी तसेच भाजीपाला यांसह सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. काही ठिकाणी पिके पाण्याखाली गेली तर काही ठिकाणी मुळासकट नष्ट झाली. शेतकऱ्यांच्या खिशाला मोठा फटका बसला असून, दिवाळीच्या तोंडावर ते अक्षरश हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली असताना शासन मात्र याकडे कानाडोळा करत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.या पार्श्वभूमीवर शेतकरी चळवळ आणि विविध शेतकरी संघटनांच्या वतीने आज तिवसा येथे तहसीलदार मयुर कळसे यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात तिवसा तालुक्याचा समावेश अतिवृष्टीग्रस्त यादीत तात्काळ करण्यात यावा शेतकऱ्यांना आर्थिक मदत त्वरित दिली जावी.शेतकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी निषेधाच्या आगळ्यावेगळ्या पद्धतीने शासनाचे लक्ष वेधले. त्यांच्या म्हणण्यानुसार शासन आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांची दिवाळी तर उजळते आहे पण तिवसातील कष्टकरी शेतकऱ्यांची दिवाळी मात्र अंधारात जात आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांशी केलेला हा अन्याय तात्काळ दूर करून त्यांना आर्थिक मदतीचा हात द्यावा अशी मागणी करण्यात आली.

# कौशल्य विकास केंद्राचा मंगळवारी रोजगार मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्या'चे मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, उस्मानिया मशिदीजवळ, डेपो रोड, अमरावती येथे हा मेळावा होणार आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येतो. मेळाव्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी विविध आस्थापना, कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे. मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी ारहरीुूरा.सीीं.ळप या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. यात ऑनलाईन सहभाग नोंदवून आपली रजिट्रेशनची प्रत काढून मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे. याबाबत अडचणी असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१–२५६६०६६ किंवा रीरींरींळीक्षसरीसारळश्र.लो या मेलवर संपर्क साधावा. मेळाव्यासाठी बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो आणि आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

# शिक्षक मतदारसंघाच्या मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर

## नोंदणीसाठी ६ नोव्हेंबर अंतिम मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती,**

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ यांच्या मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने घोषित केला आहे. यासाठी १ नोव्हेंबर २०२५ ही यासाठी अर्हता दिनांक निश्चित करण्यात आली आहे. अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघांसाठी हा कार्यक्रम राहणार आहे. मतदार नोंदणीसाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीने दि. ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत नमुना १९ मध्ये आपला अर्ज सादर करावा. यासाठी मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१ (४) नुसार प्रसिद्ध केलेल्या नोटीसची प्रथम पुनर्प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदर नोटीस जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, महानगरपालिका, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, सर्व पंचायत समिती, सर्व नगर परिषद कार्यालयांच्या नोटीस बोर्ड आणि संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. यासंबंधीचा सर्व तपशील मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आणि विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्या रीरींरींळवर्ळींळीळेप.सीीं.ळप या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

# राज्यातील 'या' तालुक्यांना मिळणार अतिवृष्टी व पूर आपत्तीच्या सवलती; तालुक्यांची सुधारित यादी आली




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

राज्यातील शेतकऱ्यांचे शेती पिक/शेतजमीन यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असून, पशुहानी, मनुष्यहानी होणे, घर पडझड होणे, पुरामुळे गावातील बाधितांना स्थलांतरीत करणे या बाबत मदत देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हास्तरीय यंत्रणेमार्फत राज्यामध्ये पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत असून त्यानुसार जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत २६.६९ लाख हेक्टर क्षेत्राचे तर सप्टेंबर २०२५ या महिन्यात जवळ-जवळ ३९ लाख हेक्टर क्षेत्राचे असे राज्यामध्ये एकूण सुमारे ६५ लाख हेक्टर क्षेत्राचे शेतीपिक नुकसान झालेले आहे.त्यामुळे राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे पूर्णतः अथवा अंशतः प्रभावित तालुके घोषित करण्यात आले होते. या मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.राज्यातील विविध तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीतील अतिवृष्टी व पूर, पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करण्यात आला आहे.

या घटकांनी पूर्णतः अथवा अंशतः प्रभावित झालेले तालुके खालील यादीनुसार आपत्तीग्रस्त घोषित करण्यात आले आहेत.

| जिल्हा | अंशतः बाधित तालुके | पूर्णतः बाधित तालुके | बाधित तालुक्यांची संख्या |
|---|---|---|---|
| बुलढाणा | नांदूरा, संग्रामपूर | चिखली, सिंदखेडराजा, देऊळगावराजा, लोणार, शेगाव, मोताळा, बुलढाणा, खामगाव, मेहकर, मलकापूर, जळगावजामोद | १३ |
| अमरावती | - | अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर | १४ |
| अकोला | - | अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शीटाकळी | ७ |
| वाशिम | - | वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा, मानोरा | ६ |
| यवतमाळ | - | पुसद, यवतमाळ, बाभूळगाव, मारेगाव, महागाव, उमरखेड, कळंब, घाटंजी, राळेगाव, दारव्हा, आर्णी, नेर, दिग्रस, पांढरकवडा, वणी, झरी जामणी | १६ |

सदर तालुक्यातील सर्व आपदग्रस्त/बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्याबाबत सदर शासन निर्णयाने मान्यता देण्यात आली आहे.

सदर सवलती पुढीलप्रमाणे,

१) जमीन महसूलात सूट.

२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.

३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती (एक वर्षासाठी)

४) तिमाही वीज बिलात माफी.

५) परीक्षा शुल्कात माफी व १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी.

# फटाक्याला अतिवृष्टीचा मोठा फटका
## उत्पादनात ४० टक्के घट, दर चढेच राहणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

दोन महिन्यातील अतिवष्टीमुळे फटाके वाळवता आले नाही. परिणामी उत्पादन ४० टक्के कमी झाले. विशेषत: सुतळी बॉम्ब वाळले नाहीत. तसेच अन्य फटाक्यांचे झाले आहे. सर्व वस्तूंवरचा वस्तू सेवा कर कमी झाला असला तरी फटक्यांवर कर जशास तसा म्हणजे १८ टक्के कायम आहे. त्यामुळे फटाक्याला अतिवृष्टीचा फटका आहे.

फटक्यांच्या कारखान्यात सर्वसाधारणपणे उन्हाळ्यात काम सुरू होते. वर्षभर फटक्याची दारू, ती दारु फटक्यात भरण्याचे बहुतांशी काम मजुरांमार्फत केले जाते. मराठवाड्यात वाशी तालुक्यातील तेरखेडा या गावी फटक्याचे अनेक कारखाने आहेत. या वर्षी मे महिन्यापासून पाऊस सुरू झाला तो दिवाळीपर्यंत कायम राहिला. पुरेशी उघडीप न मिळाल्याने फटका उत्पादन घटलेले आहे.

धाराशिव जिल्ह्यात एकूण ४८ परवानाधारक फटाका उत्पादक आहेत. त्यातील ३१ फटाका उत्पादक हे तेरखेडा आणि परिसरात फटाका निर्मितीचे काम करतात. येथील तेरखेडी तोटा हा फटका प्रसिद्ध आहे. सुतळी बॉम्ब, मातीचे भुईनळे, रंगीत आकर्षक फटाके, राजकीय कार्यक्रमांना लागणार्या आदल्याही येथे बनविल्या जातात. तेरखेडा गावातून फटाक्यांना वर्षभर मागणी असते. त्यातून हजाराहून अधिक कुटुंबांना रोजगारही मिळतो. मात्र, तयार फटाके वाळविण्यासाठी हवा असलेला वेळच मिळाला नाही.

# दिवाळीत मिठाईऐवजी आरोग्यदायी सुकामेव्याला मागणी जास्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

प्रकाशाचा सण असलेल्या दिवाळीत नातेवाइकांना आणि मित्रमंडळींना मिठाई देऊन शुभेच्छा दिल्या जातात. मात्र यंदा नागरिकांमध्ये आरोग्याबद्दल जागरूकता वाढल्याने मिठाईऐवजी सुकामेव्याला (ड्रायफ्रुट्स) पसंती दिली जात आहे. मागील वर्षापेक्षा यंदा ती अधिक आहे. त्यामुळे यंदा मार्केट यार्ड बाजारात मोठी उलाढाल पाहायला मिळत आहे. मधुमेह किंवा वजन नियंत्रणाबद्दल जागरूक लोक पारंपरिक मिठाईला पर्याय म्हणून शुगर-फ्री आणि पौष्टिक सुकामेव्याला प्राधान्य देत आहेत.



| प्रकार | पूर्वीचे दर | जीएसटी कमी करून दर |
|---|---|---|
| खजूर | ३३६ ....... | ३१५ |
| बदाम | ८९६..... | ८४० |
| काजू | ८००.... | ८०० |
| पिस्ता | १२५०.... | ११५० |
| आक्रोड | १२५०.... | ११५० |
| अंजीर | १५००... | १३०० |
| खारीक | २८०... | २५० |
| जर्दाळू | ५००... | ४०० |

**७ टक्क्यांनी घसरण झाल्याचा परिणाम**

केंद्र सरकारने अनेक जीवनावश्यक वस्तूंवर जीएसटी कर कमी केल्याने यंदा सुकामेव्याच्या दरात थेट १२ टक्के जीएसटीवरून ५ टक्के जीएसटी कमी केल्याने बदाम, अंजीर, पिस्ता यांच्या मागणीमुळे दरात ७ टक्क्यांनी घसरण झाली आहे. यामध्ये काजू, बदाम, पिस्ता आणि अंजीर यांसारख्या सुकामेव्याच्या दरात घसरण झाली आहे. त्यामुळे मागणी वाढली आहे.

**कॉर्पोरेट भेटवस्तूमध्ये सुकामेवा देण्याचा ट्रेंड**

दिवाळीमध्ये कॉर्पोरेट कंपन्या, व्यावसायिक आणि नागरिक त्यांच्या कर्मचारी, नातेवाईक आणि मित्रमंडळींना भेट देण्यासाठी आकर्षक पॅकिंगमधील सुकामेवा गिफ्ट बॉक्स मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत. त्यात पौष्टिक सुकामेवा हॅम्पर्सला पसंती दिली जात आहे.

कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये सुकामेवा भेटवस्तूंचा ट्रेंड वाढला. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा दिवाळीत त्याला मागणी वाढली आहे. यंदा मात्र केंद्र सरकारने १२ टक्क्यांवरून ५ टक्के जीएसटी केल्याने सुकामेव्याच्या दरात घट झाली आहे. यामुळे सामन्यांकडून मागणी वाढली असून दिवाळीमध्ये त्यांची दिवाळी गोड होणार आहे.

# तळेगाव ठाकूर पिंगळाई नदीवरील पूल नसल्याने शेतकऱ्यांचे हाल
## शेतीमाल वाहतुकीसाठी तातडीची पर्यायी व्यवस्था करणार - आमदार राजेश वानखडे यांच्याकडून पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११तिवसा**

तळेगाव ठाकूर परिसरातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पिंगळाई नदीवर पूल नसल्याने शेतकऱ्यांसह मजूर वर्गाला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. दररोज शेतात जाण्यासाठी नागरिकांना जीव मुठीत धरून नदी ओलांडावी लागत होती. ओव्हरफ्लो झालेल्या पाण्यामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असून, वाहतूक, दळणवळण आणि शेतीमाल ने-आण पूर्णपणे ठप्प झाली होती. विशेष म्हणजे सर्वात प्रथम हे वृत्त दैनिक विदर्भ प्रजासत्ताक मध्ये प्रकाशित झाले होते.आणि त्यांनतर या समस्येवर आता पर्यायी व्यवस्था शोधण्यात येत आहे.या समस्येची गंभीर दखल तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे यांनी ही घेतली त्यांनी नुकतीच तळेगाव ठाकूर येथे भेट दिली. त्यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधत तळेगाव-सार्सी रस्त्यावरील पिंगळाई नदी परिसर पाहणी करून तातडीने तात्पुरता पूल उभारण्यासाठी आणि पर्यायी वाहतूक व्यवस्था सुरू करण्याचे आदेश दिले.आमदार वानखडे यांनी यावेळी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता जाधव व हेडेकर यांना जागेवरच बोलावून आवश्यक त्या सूचनाही दिल्या.दरम्यान, तारा माता मंदिरापासून सुधाकरराव बेलसरे यांच्या शेतापर्यंतच्या मार्गावर तात्पुरत्या अस्तायी

स्वरूपात पाईप टाकण्याचे आणि त्यावर सिमेंट कॉंक्रीट सुद्धा करणार आहे.रस्त्यावरील मोठे खड्डे शेतकऱ्यांच्या विहरीचा मुरूम टाकून बुजविण्याचे काम सुरू होणार आहे.यामुळे शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी तातडीने पर्यायी पूल उपलब्ध होणार असून, दीर्घकाळाची अडचण काहीअंशी दूर होणार आहे.या पाहणी व चर्चेदरम्यान प्रदीप गौरखेडे, सचिन राऊत, पुरुषोत्तम मंजु, डॉ. पालीवाल, दादाराव घोडमारे, प्रमोद कावलकर, सचिन आढाव, कल्याण पाटील, दशरथ ठोंबरे, विनोद डेहनकर, अनिल हटवार, विजय माळोदे, प्रसन्न उमप यांच्यासह तळेगाव ठाकूर परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.



तळेगाव ठाकूर ते सारसी रस्ता आणि पुलाची केली आहे. या ठिकाणी शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तात्पुरती वाहतूक सुरू करण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे आदेश दिले आहेत. सदर पुलाबाबत संबंधित विभागाशी समन्वय साधून तातडीने प्रस्ताव कार्यालयाकडे पाठवणार आहे. शेतकऱ्यांचा हा प्रश्न मी वैयक्तिकरित्या पाठपुरावा करून लवकरच मार्गी लावणार आहे.

**राजेश वानखडे**
**आमदार, तिवसा**

# सर्वधर्म संमेलनातून बंधू भावाचे उद्बोधन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ गुरुकुंज मोझरी**

अखिल विश्वाला बंधुभाव, एकता आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या स्मृतिदिनानिमित्त सर्वधर्म समन्वय व प्रार्थना संमेलन हा अध्यात्मिक आणि सामाजिक भावनेने ओथंबलेला कार्यक्रम गुरूकुल येथे संपन्न झाला या संमेलनात सर्व



धर्मांचे धर्मगुरू आणि प्रतिनिधी एकत्र येऊन संमेलनाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर रक्षक यांनी केले. विविध धर्मांचे प्रतिनिधी म्हणून बौद्ध धर्माचे अभ्यासक संघरत्न मानके,सनातन धर्माचे प्रतिनिधी नामदेव गव्हाळे,ख्रिश्चन धर्माचे अभ्यासक नितीन सरदार,सिख धर्माचे राणासिंग शेरसिंग बावरी,मुस्लिम धर्माचे अभ्यासक इस्तियाक अहमद,आणि जैन धर्माचे डॉ. मेघराज कोचर यांनी सहभाग घेतला.सर्व धर्मगुरूंनी आपल्या प्रार्थना आणि विचारांमधून बंधुभाव, सहिष्णुता, शांतता आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला. कार्यक्रमाचे समन्वयात्मक समारोप आचार्य हरिभाऊ वेरुळकर यांनी केला, तर सूत्रसंचालन आकाश टाले यांनी उत्तमरीत्या केले.सायं ४:५८ वाजता मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सामुदायिक प्रार्थना घेण्यात आलीमहाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार सत्यपाल महाराज, रवी मानव, प्रेम बोके तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण संमेलनात आध्यात्मिकता, सामाजिक समरसता आणि मानवतेचा सुगंध दरवळत राहिला.

# अमरावती विद्यापीठाचा युवा महोत्सव म्हणजे तरूणाईच्या उत्साहाचा सोहळा-कुलगुरू
## श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय ठरले सर्वसाधारण विजेता; युवा महोत्सव - २०२५ चा समारोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

युवा महोत्सव मोठ्या प्रमाणामध्ये केवळ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात होतो हे अतिशय अभिमानास्पद असून अमरावती विद्यापीठाचा युवा महोत्सव म्हणजे तरूणाईच्या उत्साहाचा सोहळा आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा युवा महोत्सव-२०२५ च्या समारोपीय समारंभात अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विशेष अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, श्री गणेशदास राठी छात्रालय समितीचे अध्यक्ष श्री वसंतकुमार मालपाणी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, महोत्सवाचे समन्वयक डॉ. तीर्थराज राय, डॉ. सोनल चांडक, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. सुनिता धोपटे, निवड समितीचे अध्यक्ष डॉ. निखिलेश नलोडे, सदस्य डॉ. सावन देशमुख, डॉ. शर्मिला देशमुख, डॉ. प्रशांत बागडे, श्री विजय शर्मा, डॉ. सीमा देशमुख उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी युवा महोत्सवामध्ये चार दिवस सतत जो उत्साह दाखविला, तो तसाच पुढेही कायम ठेवावा. विकसित भारत-२०४७ ची या युवा महोत्सवाची आपली



थीम होती. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी झेन झी पार पाडत आहे. परंतु विद्यार्थ्यांनी सुध्दा ही जबाबदारी आपल्या खांद्यावर घेवून विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन करुन वक्तृत्व निर्माण करा, यशस्वी व्हा असा आशीर्वाद कुलगुरूंनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. तसेच विजेत्या चमू व सहभागी सर्व चमूंना त्यांनी शुभेच्छा दिल्या. आपल्याला पुरस्कार मिळाला नाही, याची खंत मनात न ठेवता, सहभाग महत्वाचा असून पुढे अधिक प्रयत्न केल्याने आपण नक्कीच यशस्वी होऊ असे ध्येय विद्यार्थ्यांनी ठेवावे, असा मोलाचा सल्लाही कुलगुरू डॉ. बारहाते यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना दिला. श्री गणेशदास राठी छात्रालय समितीचे अध्यक्ष श्री वसंतकुमार मालपाणी म्हणाले, जय-पराजयाचा प्रश्न नाही, तर सहभाग अधिक महत्वाचा आहे व पुढे अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत, त्यात निपूण व्हा आणि यशस्वी व्हा. मात्र शॉर्टकटचा मार्ग कधीच शोधू नका असे आवाहन सुध्दा त्यांनी विद्यार्थ्यांना केले. विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजना जर आम्हाला सुध्दा दिल्यात, तर आम्ही त्या चालवू शकू, असेही ते म्हणाले. निवड समितीचे अध्यक्ष डॉ. निखिलेश नलोडे मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, अशा प्रकारच्या युवा महोत्सवामधूनच आपण घडलो. तर परीक्षक म्हणून मुंबई येथून आलेले व मूळचे अमरावती शहरातील रहिवाशी असलेले डॉ. कुणाल इंगळे म्हणाले, आपण सुध्दा युवा महोत्सवाच्या माध्यमातूनच घडलो आणि मोठे झालो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अपयशाने निराश न होता, सातत्याने प्रयत्नरत रहावे. पत्रकारितेचा अभ्यासक्रम करणारी कु. साक्षी खेडेकर, वणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्रा. अभिजित अणे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत